


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, रविवार, दि.०८ जून २०२५

वर्ष : ०४, अंक : २९७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

# राज, उद्धव सोबत येणं काळाची गरज!

## शिंदे गटाचे नेते गजानन कीर्तीकर यांचे विधान...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** गेल्या महिन्याभरापासून ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाची चर्चा जोरात सुरु आहे. मनसे प्रमुख राज ठाकरेंनी एप्रिलच्या अखेरीस दिलेल्या मुलाखतीत उद्धव ठाकरेंसोबतच्या मतभेदासंदर्भात बोलताना एक सकारात्मक विधान केलं. आमचे वाद, भांडणं महाराष्ट्रापेक्षा मोठी नाहीत, असं राज ठाकरे म्हणाले. त्यावर पुढच्या काही तासांत उद्धव ठाकरेंची प्रतिक्रिया आली. आमच्यात वाद, मतभेद तसे नव्हतेच. काही असलेच, तर आज ते संपले. महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र या, अशी साद उद्धव यांनी घातली. त्यानंतर दोन्ही पक्षाच्या नेत्यांच्या प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली.

मागील काही दिवसांपासून शिवसेना उबाठा आणि मनसेचे नेते संभाव्य युतीसंदर्भात सकारात्मक बोलत आहेत. विशेष म्हणजे सुरुवातीला युतीच्या विरोधात सूर लावणाऱ्या मनसेच्या नेत्यांची भूमिका आता बदलली आहे. त्यांनी सकारात्मक विधानं सुरु केली आहेत. शिंदे यांच्या शिवसेनेनं या सगळ्यावर सावध पवित्रा घेतला आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्यास मुंबई महापालिका निवडणुकीत सर्वाधिक नुकसान शिंदेसेनेचं होण्याची शक्यता आहे. शिंदेसेनेचे माजी खासदार गजानन कीर्तीकर यांनी ठाकरे बंधूंच्या मनोमिलनावर प्रतिक्रिया दिली आहे. विशेष म्हणजे कीर्तीकर ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या चर्चेवर सकारात्मक बोलले आहेत.

'उद्धव आणि राज ठाकरे एकत्र यावेत ही इच्छा महाराष्ट्रातील असंख्य शिवसैनिकांची आहे. बाळासाहेबांच्या ह्यातीत त्यांनीही दोघांना सोबत आणण्याचा प्रयत्न कसोशीनं केला. बाळासाहेबांची कडवट, भव्यदिव्य शिवसेना या महाराष्ट्रात परत अवतरायची असेल तर एकनाथ शिंदेसुद्धा यांच्यासोबत आले पाहिजेत, असं माझं प्रामाणिक मत आहे,' असं कीर्तीकर म्हणाले.

शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर ४० आमदारांनी शिंदेंना साथ दिली. त्यानंतर बहुतांश खासदारदेखील शिंदेसोबत गेले. कीर्तीकर सर्वात उशिरा शिंदेसेनेत दाखल झाले. पक्षफुटीनंतर ते ठाकरेंच्या काही कार्यक्रमांना, मेळाव्यांना उपस्थित होते. पण अखेर त्यांनी शिंदेसेनेची वाट धरली. विशेष म्हणजे त्यांचं कुटुंब ठाकरेंसोबत कायम राहिलं. आपण कुटुंबाच्या विरोधात जाऊन पक्षांतराचा निर्णय घेतल्याचं कीर्तीकर यांनी सांगितलं होतं. शिंदेसेनेत गेलेल्या कीर्तीकर यांचं तिकीट पक्षानं कापलं. त्यांच्या जागी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर पक्षात आलेल्या रविंद्र वायकरांना संधी दिली.

# मुंब्र्यात बनावट देशी दारु साठ्यावर कारवाई ; ५१ लाखाचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०७, ठाणे :** मुंब्रा-पनवेल रोडवर ए के ईलेक्ट्रीकलं समोर, शिळफाटा येथील बेकायदेशीररित्या बनावट देशी दारुचा साठ्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोकण विभागीय भरारी पथकाने ५ जून रोजी कारवाई केली. या कारवाईत एकूण ५१ लाख ३२ हजार ९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मुंब्रा-पनवेल रोड, मुंब्रा, शिळफाटा या परिसरातून गोवा राज्यातील बनावट देशी दारुची वाहतूक होणार आहे, अशी माहिती मिळाल्यावरुन निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्या टीमने सापळा रचला. त्यानंतर चॉकलेटी रंगाचा आयशर कंपनीच्या क्र. जीजे-०६-बीव्ही-५८२२ या ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात गोवा राज्यातील बनावट देशी दारुचे ९० मिलीचे १२१ बॉक्स व १८० मिलीचे ७२९ बॉक्स जप्त केले. यामध्ये आरोपी लक्ष्मण सिंह नाथू सिंह राठोड, वय ३७ वर्षे, रा. बस्सी, ता. सलुंबर, जि. उदयपुर (राजस्थान) यास अटक करुन परराज्यातील बनावट देशी दारु वाहतुकीसाठी वापरलेला चॉकलेटी रंगाचा आयशर कंपनीच्या वाहनासह गोवा राज्यातील बनावट देशी दारुचे एकूण ८५० बॉक्स, एक मोबाईल व एका वाहनासह अंदाजे किंमत ५१,३२,९४० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांच्या मार्गदर्शनात सह आयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार, ठाणे अधीक्षक प्रविण तांबे यांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात आली. ही कारवाई निरीक्षक दिगंबर शेवाळे, दुय्यम निरीक्षक श्री. यादव, रिंकेश दांगट, व्हि. व्हि. सकपाळ, सहा. दुय्यम निरीक्षक महावीर कोळेकर, तसेच जवान श्रीराम राठोड, हनुमंत गाढवे, अमीत सानप, कुणाल तडवी, हर्षल खरबस यांनी यशस्वीरित्या पार पाडली. दुय्यम निरीक्षक एच. बी. यादव हे पुढील तपास करत आहेत, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

दरम्यान, साताऱ्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन केल्याप्रकरणी दोन जणांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, २८ रोजी बॉम्बे रेस्टॉरंट येथील फर्न हॉटेलच्या शेजारी असणाऱ्या मोकळ्या जागेत चैतन्य संजय कांबळे रा. रविवार पेठ सातारा हा बेकायदेशीररित्या अंमली पदार्थाचे सेवन करीत असताना आढळून आला. अधिक तपास पोलीस हवालदार यादव करीत आहेत.दुसऱ्या घटनेत, त्याच परिसरात सिद्धार्थ संजय पाटोळे रा. रविवार पेठ सातारा हा अंमली पदार्थाचे सेवन करताना आढळून आला. अधिक तपास महिला पोलीस नाईक गोळे करीत आहेत.

# आ.मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे मुल एसडीओ कार्यालयातील सभागृहाच्या नूतनीकरणाचा मार्ग मोकळा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे मुल येथील एसडीओ कार्यालयातील सभागृहाचे नूतनीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. आ. मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच या कामाकरिता १ कोटी ३० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

मुल येथील आढावा बैठकीत आ. मुनगंटीवार यांनी सभागृहाच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधून तातडीने काम सुरू करण्याचे निर्देश दिले होते, हे विशेष. आ. मुनगंटीवार यांच्या निर्देशांनंतर प्रशासनाने सभागृहाच्या नूतनीकरणासाठी आवश्यक निधीची मागणी केली होती. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी या निधीसाठी पाठपुरावा केला व आता सभागृहाच्या नूतनीकरणासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. सभागृहाच्या नूतनीकरणामुळे प्रशासकीय बैठका आणि विविध कार्यक्रम अधिक चांगल्या पद्धतीने आयोजित करता येणार आहेत. त्याचा फायदा थेट नागरिकांना होणार आहे. त्यासोबतच, सभागृहाच्या नूतनीकरणामुळे स्थानिक प्रशासनाची कामकाजाची क्षमता वाढेल आणि नागरिकांना चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

**मुल तालुक्याचा चेहरामोहरा बदलला...**

मूल येथे मुख्य रस्ता, कर्मवीर मा.सा. कन्नमवार सभागृह, तहसील कार्यालय, पंचायत समितीची इमारत, पाणीपुरवठा योजना, स्टेडियम, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय, इको पार्क, स्विमिंग टँक, आठवडी बाजार असे विविध विकासकामे तालुक्यात झाली. १०० खाटांच्या मुल उपजिल्हा रुग्णालयाला मान्यता मिळाली, कामं प्रगतीपथावर आहे. सोमनाथ येथे भव्य कृषी महाविद्यालय उभे राहत आहे. तसेच मुलींसाठी शुरवी महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा करत मुल तालुक्याचा चेहरामोहरा बदलला आहे.

# आईसह दोन मुलीचा गोदावरी नदीत बुडून मृत्यू

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०७, नांदेड :** उमरी तालुक्यातील मोजे भायेगाव येथे गोदावरी नदीवर कपडे धुण्यासाठी गेलेल्या आईसह दोन मुलीचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना भायेगाव येथे दुपारी साडेबाराच्या दरम्यान घडली आहे. भायेगाव दलीतवस्तीतील बोर नादुरुस्त झाल्याने गावात पाणी उपलब्ध नसल्याने नाईलाजाने कपडे धुण्यासाठी गोदावरी नदीत गेलेल्या कु. पायल भगवान हनुमंते वय १४ वर्ष हिचा पाय घसरून नदीत तोल गेल्याने नदीपात्रात पडली तिला वाचवण्यासाठी तिची बहीण ऐश्वर्या मालु हनुमंते वय १३ वर्ष व तिची आई महानंदा भगवान हनुमंते वय ३५ वर्ष हे गेले असता गोदापत्रात गाळ आणि पाणी जास्त असल्यामुळे या तिघांचाही बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. हे तिघे जण बुडाल्याची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरली गावातील नागरिकांनी गोदावरी नदीकडे धाव घेतली असता तिघाचेही मृतदेह दिसत नव्हते. शेवटी गळाच्या साह्याने या तिघांचा शोध घेतला असता मृतदेह गळाला लागून बाहेर आले. या या दुर्दैवी घटनेमुळे भायेगाव सह तालुक्यांत हळहळ व्यक्त होत आहे.

## थोडक्यात

### नेरूळ येथे अनधिकृत लॉजिंग अँड बोर्डिंगवर धडक सीलबंद कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** सेक्टर ४४ ए नेरूळ येथे भूखंड क्र.५ ते ९ या ठिकाणी आऊट स्टे हॉटेल अँड अपार्टमेंट या नावाने लॉजिंग अँड बोर्डिंगचा विनापरवानगी व्यवसाय अनधिकृतपणे करण्यात येत होता. सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त डॉ.राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली, बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ.अमोल पालवे तसेच परवाना विभागाच्या सहा.आयुक्त शिल्पा देशपांडे व इतर अधिकारी - कर्मचारी यांनी नमुंमपा पोलीस पथकाच्या सहयोगाने त्याठिकाणी धडक कारवाई करीत सदर आस्थापना सीलबंद केली.

५ जून २०२५ रोजी दुपारी ३ ते ७.३० वा. कालावधीत तळमजला ते २३ मजल्यापर्यंतच्या ४३ व्यावसायिक रूम्स सीलबंद करण्याची कारवाई करण्यात आली. तसेच या कारवाई दरम्यान सदर आस्थापनेने अनधिकृतपणे लावलेला आऊट स्टे हॉटेल अँड अपार्टमेंट असा नामफलकही काढून टाकण्यात आला.

यापूर्वी संबंधित आस्थापनेच्या मालकास १ एप्रिल २०२५ रोजी कलम ३७६ अन्वये नोटीस देऊन व्यवसाय परवाना घेण्याचे सूचित करण्यात आले होते. त्यास अनुसरून त्यानुसार संबंधित आस्थापनेच्या मालकाने परवाना विभागाकडे ऑनलाईन पद्धतीने परवानगी मिळावी यासाठी अर्ज केला होता. तथापि सदरहू इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र नसल्याने संबंधितांनी केलेला अर्ज फेटाळण्यात आला होता. त्यानंतर दि.२० मे २०२५ रोजी सदर आस्थापना बंद करावी अन्यथा कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे संबंधितांस कळविण्यात आले होते. मात्र सदर आस्थापना नोटीस देऊनही सुरू ठेवल्यामुळे आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार सदर आस्थापना मोहोरबंद करण्याची कारवाई करण्यात आली.

### मरोळमध्ये एनएमएमटी ला भीषण आग



**अक्षराज : अमोल सूर्यवंशी**

**दि.०७, खारघर (नवी मुंबई) :** नवी मुंबई परिवहन उपक्रमाच्या (एनएमएमटी) शुक्रवारी सायंकाळी मरोळ मध्ये भीषण आग लागली. चालक व वाहक यांनी प्रसंगावधान व तत्परता दाखवत ४० प्रवासी बस मधून सुखरूप उतरवले त्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही. परंतु बस मात्र जळून खाक झाली. एन एम टी ची १४४ क्रमांकाची बस अंधेरीहून ऐरोलीच्या दिशेने जात होती. चालक संदीप शिल्लारे यांनी स्टेरिंग खाली असलेल्या डिस्प्लेवर काही तांत्रिक बिघाड असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर बस बंद पडली त्यानंतर बसच्या पाठीमागून अचानक धूर निघण्यास सुरुवात झाली. त्यामुळे चालक तत्पर झाला. त्यामुळे बसमधील दोन्ही दरवाजे खोलण्याचा प्रयत्न केला परंतु बसमधील मधला दरवाजा प्रवाशांना चढउतार करण्याचा अचानक लॉक झाला. परंतु सुदैवाने प्रवाशांना उतरण्याकरिता पुढील दरवाजे अचानक खुला झाला त्यामुळे सदरचालक वाहक यांनी सर्व प्रवासी बस मधून उतरवण्यास सुरुवात केली व जीवित हानी टळली.

### पालकमंत्र्यांच्या दौ-यावेळीच चंद्रभागा वाळवंटातुन अवैध वाळू उपसा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** चंद्रभागा वाळवंटात गाढवावरून व बंधारे मध्ये थर्माकोलचे चक्को बनवून नदीतून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत आहे. या वाळू उपशावर कारवाई करावी, असे आदेश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले आहेत; मात्र याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. शुक्रवारी पालकमंत्री जयकुमार गोरे चंद्रभागा वाळवंटात पाहणी करत असताना त्यांच्या समोरच अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे दिसून आले. यामुळे आत्ता पालकमंत्री गोरे कोणावर कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे. अवैध वाळू उपशामुळे चंद्रभागा वाळवंट व नदीमध्ये मोठे खड्डे पडले आहेत. याचा त्रास भाविकांना सहन करावा लागत आहे.

अवैध वाळू उपशाकडे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी लक्ष केंद्रित केले असून अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करावी, असे आदेश दिले आहेत. मात्र लक्ष्मीदर्शन मिळत असल्यामुळे पोलीस व महसूल प्रशासनातील अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याची चर्चा होत आहे. पंढरपूर तालुक्यातील कौठाळी, इसबावी, शिरढोण येथे टिपर व छोट्या गाडीने वाळू उपसा मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे व चंद्रभागा वाळवंट नदीपात्रातून अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची बैठक घेण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे शुक्रवारी पंढरपूर येथे आले होते. यावेळी त्यांनी चंद्रभागा वाळवंटात जाऊन पाहणी केली. तेव्हा त्यांच्यासमोरच चंद्रभागा नदी पत्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असल्याचे दिसून आले. यामुळे आता पालकमंत्री गोरे कोणावर कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे.

## संपादकीय



### जल्लोषाचे रूपांतर शोकसागरात

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर देशभर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला अर्थात आपला संघ विजेता ठरल्यानंतर अशा प्रकारचा स्वागत समारंभ आयोजित करण्याची ही पहिली वेळ नाही याआधीही असे अनेक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले होते मात्र या स्वागत समारंभादरम्यान जी चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडली तशी दुर्घटना याआधी कधीही घडली नाही. या दुर्घटनेत ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. मंगळवारी मध्यरात्री आयपीएलचा अंतिम सामना पार पडल्यानंतर २४ तासाच्या आत असा समारंभ घेण्याची गरज होती का ? हा समारंभ आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का ? अवघ्या २४ तासाच्या आत इतक्या मोठ्या समारंभ आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाही पोलिसांशी चर्चा केली होती का ? हा समारंभ चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित करण्यात आला या स्टेडियमची क्षमता ३५ ते ४० हजार इतकी आहे प्रत्यक्षात या समारंभासाठी त्याच्या दहा पट म्हणजे अडीच ते तीन लाख क्रिकेट चाहते जमा झाले. या समारंभाला अपेक्षेपेक्षा अधिक चाहते जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का ? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का ? हा समारंभ म्हणजे केवळ इव्हेंट होता का ? या समारंभाच्या आडून राजकीय स्वार्थ साधला जाणार होता का ? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ११ क्रिकेट चाहत्यांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण ? आयोजक, कर्नाटक सरकार की स्वतः चा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही क्रिकेट चाहते? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सव प्रिय आहेत. विशेषतः तरुणांना उत्सवात सहभागी होण्याची फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी.

**या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ११ क्रिकेट चाहत्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!**

# शिवरायांप्रतीचा आदर आचरणातही दिसावा !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**



शिवजयंती आणि शिवराज्याभिषेक दिन हे समस्त शिवभक्तांच्या जीवनातील प्रमुख उत्सव. यंदा पावसाळा असतानाही किल्ले रायगडावर शिवभक्तांच्या अफाट सागर लोटलेला पाहायला मिळाला. आपल्या प्रगल्भ बुद्धीचातुर्याने आणि अतुल पराक्रमाने पाच पातशाह्यांना शह देणाऱ्या. कडे- कपाऱ्यांतील मावळ्यांचे संघटन उभारून हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या महापराक्रमी, महाबली शिवरायांचा वारसा महाराष्ट्राला लाभला हे महाराष्ट्राचे परमभाग्यच म्हणावे लागेल.

शिवरायांची कीर्ती आज सातासमुद्रापलिकडे पोहोचली आहे. जगातील अनेक विद्यापीठांमधून आज शिवरायांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या आदर्श राज्यकारभाराचा इतिहास शिकवला जात आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात. चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मिळतात. गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे किचैन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ होत चालली आहे. शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रती प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत असतानाचे चित्र आज दिसत आहे. ट्रेन-बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर सर्रासपणे करताना आढळतात. गाड्यांवर लावण्यात आलेले महाराजांच्या प्रतिमेचे अथवा नावाचे स्टिकर म्हणजे खुद्द महाराजच आहेत या भावाने त्याची नियमितपणे स्वच्छता करणारे शिवभक्तही तुलनेने कमीच आहेत. स्वतःला शिवभक्त म्हणवून घेणारे अनेक जण रस्त्यावर वाहतूक पोलिसांशी किंवा अन्य वाहनचालकाशी अरेरावी करताना किंवा वाद घालताना दिसून येतात. गाडीवर लावलेल्या स्टिकरच्या रूपाने आपल्यासोबत महाराजही आहेत आणि त्यांचे आपल्या प्रत्येक कृतीकडे बारीक लक्ष आहे हा भाव आपल्यात का निर्माण होत नाही ? जेव्हा आपण आपल्या गाडीवर महाराजांच्या प्रतिमेचे स्टिकर लावतो, गळ्यात शिवप्रतिमा परिधान करतो, कपाळावर चंद्रकोर लावतो आणि महाराजांसारखी दाढी मिशी ठेवतो तेव्हा या सर्वांसोबत आपली जबाबदारीही वाढते हे लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टीविषयी आपल्यामध्ये तितकेसे गांभीर्य नसले, तरी समाज आपल्याकडे शिवभक्त म्हणून आदराने पाहतो हे ध्यानात ठेवायला हवे. त्यामुळे आपल्या प्रत्येक कृतीमधून शिवरायांच्या शिकवणुकीचा आदर्श दिसून यायला हवा. उपरोक्त गोष्टी परिधान करून आपण कार्यालयांत भ्रष्टाचार करत असू, गाडीवर महाराजांचे स्टिकर लावून वाहतुकीचे नियम पळत नसू, इतरांशी विनाकारण वाद घालत असू, घरी आई वडिलांचा आदर करत नसू, मुखातून अपशब्द उच्चारात असू तर समाज आपल्याकडे हीन दृष्टीने पाहिलच शिवाय प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचाही आपल्याकडून अवमान घडेल हे लक्षात घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेव्हढे सोपे आहे तेव्हढेच कठीण शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा !

# मृग नक्षत्राच्या आठवणी...






जून महिन्यात साधारणतः ७ जूनला किंवा ८ जूनला मृगशीर्ष अर्थात मृगनक्षत्राला प्रारंभ होतो. यावर्षी ८ जूनला मृग नक्षत्राला सुरुवात होत आहे. ग्रामीण भाषेत याला मिरूग निघाला असे म्हणतात. या मिरगाच्या संबंधाने शालेय अभ्यासक्रमात अनेक पाठ आम्ही अभ्यासले आहेत. बालपणातील मृग नक्षत्राच्या आठवणी आजही ताज्या आहेत असे वाटते. मिरगाला प्रारंभ होण्यापूर्वीच अवकाळी पाऊस कोसळायचा आणि मृग नक्षत्राचा दिवस उजाडला की मान्सूनचा पाऊस पडायचा.आम्ही रानावनात गेलो की मिरगाचे लाल किडे पाहिले की मनाला खूप खूप आनंद व्हायचा. हे मिरगाचे लाल मऊ लुसलुशीत किडे जिकडे तिकडे वळवळताना पाहिले की आता पाऊस चांगला पडणार असा अंदाज आम्ही बांधायचो.मग शेतकऱ्यांना पेरणीचे वेध लागायचे. सुताराकडे जाऊन तिफण आणि तिफणीचे साहित्य दुरूस्त करून घ्यायचे. खते आणि बी बियाणे यांची जुळवाजुळव करत असत. सुताराच्या घरासमोर शेतकऱ्यांची गर्दी झालेली असायची. मृग नक्षत्राच्या दिवशी कसलाही गाजावाजा न करता, गडगडाट न करता मान्सूनचा मुसळधार पाऊस पडायचा. सगळ्या शिवारात पावसाचे पाणीच पाणी वाहायचे. सगळी धरणी ओलेचिंब होत आहे. मान्सूनचा पाऊस ठरल्याप्रमाणे दररोज पडायचा. आठ दिवसांत धरतीचे रुप बदलून जायचे. जिकडे तिकडे हिरवे गवत फुटू लागायचे. रानभाज्या डोके वर काढायच्या. तरवट्याची, खडक शेपूची, रानपात्राची, तांदुळज्याची भाजी खाताना खूप मजा येत असे. चिंचेच्या चिगुराची आणि उंबराच्या दोड्यांची भाजी भाकरीसोबत मस्त चवदार लागायची.पेरणीची कामे येत नसतील तरीही काही शेतकरी पेरणीच्या कामाला घेऊन जायचे. ते सांगतील तसे आम्ही पेरणीचे काम करायचो.

पेरणीची कामे आटोपली की शाळेची घंटा वाजायची. मग आम्ही नवीन पुस्तके व नव्या वह्या घेऊन शाळेत आनंदाने जायचो. आमचे दप्तर असायचे खताच्या पोत्याचे. त्यात वह्या, पुस्तके, पेन ठेवून ते दप्तर हातात घेऊन आम्ही शाळेला जायचो.शाळेला जाताना रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या शेतातील लहान लहान पिकांचे रोप पाहिले की मनाला एक वेगळाच आनंद मिळायचा आणि पहिल्या मुसळधार पावसाने नदीनाले दुथडी भरून वाहू लागले की वडिलधारी मंडळी मासे धरायचे.त्या माशांचे झणझणीत कालवण खाताना एक वेगळाच आनंद मिळायचा. मृग नक्षत्राच्या या सगळ्या आठवणी मनाच्या कक्षेत आजही साठवून ठेवल्या आहेत.

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.**

### धारिष्ट..

पुन्हा व्हावे का एक
निर्णय घेतीलं वरिष्ठ
गुपचूप या आदेशाचे
पालन करती कनिष्ठ

सामान्यकार्यकर्त्यांस
अधिकार ना विशिष्ट
हिंमत न विचारायची
कुणांला आहे धारिष्ट

अंतर्मने कुणा कळले
खरोखर काय उदिष्ट
माळी घेतीलं मेहनत
इतरांना फळे स्वादिष्ट

चालत राहे पाठोपाठ
मेंढरे सगळी एकनिष्ठ
उपकाराखाली दबली
मंडळी सगळी कर्मिष्ठ

मित्रबनवावे सोईस्कर
म्हणतीलं जसे ते जेष्ठ
शत्रुशी हात मिळवावे
वेळचं शेवटी सर्वश्रेष्ठ

राजकारणात गुंतागुंत
समजणे अती क्लिष्ट
सोडवते गुंताळ वरिष्ठ
येते कसले जरीअरिष्ट

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात बकरी ईद उत्साहात साजरी

## शांतता व सामाजिक सलोख्यासाठी प्रार्थना...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, अहिल्यानगर :** शहरासह जिल्ह्यात मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईद (ईद उल अजहा) शनिवारी (दि.७ जून) मोठ्या उत्साहात साजरी केली. शहरातील ईदगाह मैदान येथे सकाळी ९:३० वाजता ईदची नमाज मौलाना नदिम अख्तर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी शहरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नमाजच्या प्रारंभी धार्मिक व्याख्यान, नमाजनंतर खुदबा व त्यानंतर मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा केली. देशात शांतता, समृध्दी व सामाजिक सलोख्यासाठी प्रार्थना करण्यात आली. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील विविध मशिदी मधून बकरी ईदची नमाज अदा करण्यात आली. ईदनिमित्त प्रमुख नमाज पठण कोठला येथील ईदगाह मैदानात झाले. मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या भेटी-गाठी घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. तर कुर्बानी करताना इतर धर्मियांना त्रास होणार नाही, यासाठी समाजबांधवांना विशेष सूचना करण्यात आल्या.



पोलीस प्रशासनाच्या वतीने खबरदारी म्हणून ईदगाह मैदानसह शहरातील चौका-चौकात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोठला येथून जाणारी वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळविण्यात आली होती. नमाजनंतर शहरातील विविध कब्रस्तान व दर्गामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गद केली होती.बकरी ईद निमित्त तीन दिवस म्हणजे शनिवार पासून सोमवार पर्यंत घरोघरी कुर्बानी केली जाणार आहे. सोशल मीडियावर देखील बकरी ईदच्या शुभेच्छांचा पाऊस पडला होता.

# मेटगुताड येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०७, महाबळेश्वर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ग्रामपंचायत मेटगुताड व हिलदारी अभियानाच्या वतीने ग्रामपंचायत मेटगुताड या ठिकाणी विविध पर्यावरण जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधनांचे वाटप, स्वच्छता रॅली आणि वृक्षारोपणाचा समावेश होता.

या कार्यक्रमास पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यशवंत भांड, विस्तार अधिकारी विठ्ठल पवार, मेटगुताडचे सरपंच भिकन बावळेकर, ग्रामसेवक तेजस निकम, तसेच ग्राम पंचायत सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळा मेटगुताड येथील १४६ विद्यार्थी व सर्व शिक्षकांनी स्वच्छता रॅलीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. ही रॅली ग्रामपंचायत कार्यालयापासून सुरू होऊन कुंभळजाई मंदिरापर्यंत पार पडली. मंदिर परिसरात पोहोचल्यानंतर तेथे ३० स्थानिक वृक्षांचे रोपण करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली. त्यानंतर गटविकास अधिकारी यांच्या हस्ते १० स्वच्छता कर्मचाऱ्यांना रेनकोट, हँडग्लोव्ज, मास्क आणि टोप्या यांचा समावेश असलेली सुरक्षा कीट वाटप करण्यात आली. रॅलीमध्ये सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप 'स्वच्छतेची शपथ' घेऊन झाला, ज्याद्वारे सर्वांनी स्वच्छ आणि हरित पर्यावरण राखण्याचा निर्धार व्यक्त केला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## विंचूर च्या अश्विनी नवले महाराष्ट्रात प्रथम



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, विंचूर (नाशिक)** : विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात शिक्षण झालेल्या अश्विनी नवले यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महिला बालविकास अधिकारी परिक्षेत राज्यात मुलींमधून प्रथम क्रमांकाने निवड झाली आहे. त्याबद्दल नाशिकचे माजी खासदार समीर भुजबळ यांनी विंचूर दौऱ्यावर असताना अश्विनी नवले हिचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. विंचूर गावातील विविध सामाजिक कार्यकर्ते व पक्षांकडून अश्विनी नवले यांचा सत्कार करण्यात येत आहे. विंचूर शहराला अभिमान वाटेल असे कामगिरी त्यांनी केल्याने सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. शहरातील तरुणांनी व तरुणांनी यांच्यासारखा आदर्श घ्यावा असे ज्येष्ठ नागरिकांनी आव्हान केले आहे. याप्रसंगी नवले कुटुंबातील सदस्यांसह विलास गोरे, पांडुरंग राऊत, अनिल विंचूरकर, ओम राऊत, समाधान जेजूरकर यांच्यासह विंचूर येथील सर्व शिंपी समाज बांधवांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी पदाधिकारी उपस्थित होते.

## बदली झालेल्या पोलिसांचा कळंबच्या नागरिकांकडून सत्कार व निरोप




**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०७, धाराशिव** : कळंब पोलीस स्टेशन येथे गेली ६ वर्ष सेवेत असलेले पोलीस नाईक श्रीराम कालिदास मायंदे यांची जिल्हा विशेष शाखा धाराशिव येथे व त्यांच्या पत्नी महिला पोलीस नाईक राजश्री बाबुराव जावळे - मायंदे (पती-पत्नी) यांची आनंदनगर पोलीस ठाणे धाराशिव येथे बदली झाली असून त्यांनी गेली ६ वर्ष कळंब पोलीस स्टेशन येथे केलेल्या उत्कृष्ट सेवेतुन जनसामान्यात आपुलकी आदराचे स्थान मिळवले आहे. त्यांनी वृक्षारोपण तसेच पोलीस स्टेशनच्या वतीने राबवण्यात आलेल्या विविध समाज उपयोगी उपक्रमात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांचा पालकमंत्री, पोलीस विभागाचे अधिकारी यांनी त्यांचा सत्कार केला आहे. कामकाजातील अडचणी तसेच केलेल्या कामाची कसली ही तक्रार राहणार नाही. याची ते दक्षता घेतात. हा सत्कार कार्यक्रम कळंब पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभा पुंडे यांच्या उपस्थितीमध्ये कळंब शहरातील ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने मायंदे पती-पत्नींचा फेटा, शाल, पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला व याप्रसंगी त्यांना पुढील वाटचालीसाठी यश, उत्तम आरोग्य, मिळावे. यासाठी शुभेच्छा दिल्या याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक महादेव महाराज अडसूळ, प्रकाश भडंगे, सुभाष घोडके, माधवसिंग राजपूत, बंडू ताटे, सतपाल बनसोडे, निशिकांत गायकवाड, सचिन क्षिरसागर, पोलीस कर्मचारी गोविंद मोटे गावकर, बालाजी मोरपल्ले, भारत गायकवाड, औदुंबर गजभार यांची उपस्थिती होती.

## आदिवासी बांधवांना हक्क मिळवून देणे हे माझे कर्तव्य - सुजित झावरे

### आदिवासी शेतकऱ्यांना वन हक्क कायद्याअंतर्गत २४ एकर जमीन वाटप



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर)** : आदिवासी बांधवांना त्यांचा हक्क मिळवून देणे हे माझे कर्तव्य होते. वन हक्क कायद्याअंतर्गत जमीन मिळाल्याने या शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल आणि त्यांना स्वावलंबी जीवन जगता येईल. शासनाच्या या योजनेला गती देण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हाच आमच्या प्रयत्नांचा खरा पुरस्कार आहे, असे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले. पारनेर तालुक्यातील पोखरी पवळदरा येथील १२ आदिवासी भूमीहीन शेतकऱ्यांना वन हक्क कायद्याअंतर्गत प्रत्येकी दोन एकर अशा एकूण २४ एकर जमिनीचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे यश प्राप्त झाले. या जमिनींच्या वाटपाचे प्रमाणपत्र वितरण समारंभ पोखरी येथे सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते संपन्न झारला. यावेळी शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य अमोल साळवे, कोरठण खंडोबा देवस्थानचे माजी विश्वस्त किसनराव धुमाळ, सरपंच हिराबाई पवार, उपसरपंच झुंबराबाई पवार, माजी उपसरपंच बाळासाहेब शिंदे, म्हसोबा झापचे सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग आहेर, युवा नेते सतीश पवार, सरपंच संजय काशीद, ज्येष्ठ नेते निजाम पटेल, इंजि. प्रसाद झावरे, पोखरी सेवा सोसायटीच्या संचालिका जयश्री शिंदे, बाबुराव पवार, संतोष ढोकळे, अशोक पवार, आनंदा केदार, रोहिदास शिंदे, नामदेव कारंजेकर, राहुल मधे, मन्सूर पटेल, भूमिपुत्रचे अन्सार पटेल, पोपट कसबे, युवा नेते अमीन पटेल, प्रकाश पवार, तुषार पवार, दत्ता वाकळे, अमोल पवार, संजय कारंजेकर, गोरख फरतारे, गणेश पवार, रामदास पवार, रावसाहेब पवार, महेंद्र शिंदे, अन्वर शेख, मुन्नावर सय्यद, रोहिदास दरेकर, विक्रम पवार, सुभाष वाकळे, पंढरीनाथ खैरे, संजय कोकाटे, अनिल शिंदे, जयश्री पवार, यांच्यास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बनावट देशी दारू साठ्यावर कारवाई; ५१.३२ लाखाचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, मुंब्रा (ठाणे) :** ए.के.इलेक्ट्रीकल्स समोर, मुंब्रा-पनवेल रोड, मुंद्रा, शिळफाटा (ता.जि.ठाणे) येथे बेकायदेशीररित्या बनावट देशी दारूच्या साठ्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोकण विभागीय भरारी पथकाने ५ जून रोजी कारवाई केली. या कारवाईत एकूण ५१ लाख ३२ हजार ९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मुंब्रा-पनवेल रोड, मुंब्रा, शिळफाटा या परिसरातून गोवा राज्यातील बनावट देशी दारुची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाल्यावरुन निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्या टीमने सापळा रचत चॉकलेटी रंगाचा आयशर कंपनीच्या क्र. जीजे-०६ / बीव्ही-५८२२ या ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात गोवा राज्यातील बनावट देशी दारुचे ९० मिलीचे १२१ बॉक्स व १८० मिलीचे ७२९ बॉक्स जप्त केले. यामध्ये आरोपी लक्ष्मण सिंह नाथू सिंह राठोड, वय ३७ वर्षे, रा. बस्सी, ता. सलुंबर, जि. उदयपूर (राजस्थान) यास अटक करुन परराज्यातील बनावट देशी दारू वाहतुकीसाठी वापरलेला चॉकलेटी रंगाचा आयशर कंपनीच्या वाहनासह गोवा राज्यातील बनावट देशी दारुचे एकूण ८५० बॉक्स, एक मोबाईल व एका वाहनासह अंदाजे किंमत ५१,३२,९४० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

# कबड्डी स्पर्धा पुण्यात रंगणार

## १८ वर्षांखालील पहिली मुले आणि मुलींची राज्य अजिंक्यपद निवड चाचणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, पुणे :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आणि पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने आमदार सचिनभाऊ अहिर यांच्या मार्गदर्शनाखाली १८ वर्षांखालील मुले आणि मुली यांची राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा पुण्यात रंगणार आहे.

शिवशक्ती महिला मंडळाच्या यजमानपदाखाली होणाऱ्या या स्पर्धेला आमदार बाबाजी काळे व बापूसाहेब पठारे यांचे सहकार्य लाभले असून दिनांक १४ ते १८ जून २०२५ दरम्यान ही स्पर्धा पार पडेल. ही स्पर्धा श्री छत्रपती शिवाजी महाराज संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे पार पडणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांचे एकूण ३१ संघ सहभागी होणार आहेत. या निवड स्पर्धेतून निवडण्यात आलेला संघ हरिद्वार (उत्तर प्रदेश) येथे २८जून ते ०१ जुलै २०२५ पासून होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतात. स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक १४ जून २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता शिवसेना युवा नेते आमदार आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

स्पर्धेसाठी २५ जिल्ह्यांतील सुमारे १ हजार खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक सहभागी होणार असून ९०० हून अधिक खेळाडूंसाठी निवास व भोजनाची सोय करण्यात आली आहे. बालेवाडी येथील बंदिस्त क्रीडा संकुलातील चार मैदाने आणि इतर क्रीडांगणांवर ही स्पर्धा होणार आहे.

**स्पर्धेतील सहभागी संघ**

१. मुंबई शहर पूर्व, २. मुंबई शहर पश्चिम, ३. मुंबई उपनगर पूर्व, ४. मुंबई उपनगर पश्चिम, ५. ठाणे शहर, ६. ठाणे ग्रामीण, ७. रायगड, ८. रत्नागिरी, ९. सिंधुदुर्ग, १०. पुणे शहर, ११. पुणे ग्रामीण, १२. पिंपरी-चिंचवड, १३. अहमदनगर, १४. सातारा, १५. सांगली, १६. कोल्हापूर, १७. नाशिक शहर, १८. नाशिक ग्रामीण, १९. जळगाव, २०. धुळे, २१. बीड, २२. उस्मानाबाद, २३. लातूर, २४. जालना, २५. औरंगाबाद, २६. परभणी, २७. नांदेड, २८. सोलापूर, २९. हिंगोली, ३०. नंदुरबार, ३१. पालघर.

**मुख्य वैशिष्ट्ये :-**

सहभागी जिल्हे : २५

एकूण संघ : ३१

एकूण खेळाडू : सुमारे १०००

स्पर्धेचे ठिकाण : शिवाजी महाराज संकुल, म्हाळुंगे- बालेवाडी, पुणे

## बारड पोचम्मा देवीची ५ चांदीची मुकूटे गायब; देवीच्या 'वीस लक्ष' विकास निधीवर ही डल्ला



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०७, मुदखेड (नांदेड)** : तालुक्यातील बारड येथील जागृत देवस्थान पोचम्मा देवीचा पारंपरिक आंबिल महोत्सव चांदीच्या मुकुटाविना साजरा करण्यात आला असल्याने नांदेड येथील प्रसिद्ध व्यापारी 'मंत्री' यांनी दान दिलेली देवीची ५ हिरेजडीत मुकटे कुठे गेली असावीत. याचा शोध विश्वस्थांनाच घ्यावा लागत आहे. शासनाने देवीच्या विकासासाठी २७ लक्ष रुपयाचा निधी दिला होता. त्यात केवळ सात लक्ष रुपयांचेच पथदिवे बसविल्याने देवीच्या २० लक्ष निधीवर नेमका डल्ला मारला कुणी ? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी केला आहे.

पुरातन काळातील परंपरेनुसार सालाबादप्रमाणे याही वर्षी बैल जोडीची सजावट करून ढोलताशांच्या गजरात सुवासिनीच्या पारंपरिक वेशभूषेत गावातील प्रमुख रस्त्यांवरून पोचम्मा देवीची आंबिल मिरवणूक काढण्यात आली होती.

या मिरवणुकीत पोतराज, गोंधळी यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले होते. भक्तिमय वातावरणात आंबिल मिरवणूक हनुमान मंदिर, मानेजी बापू मंदिर, विठ्ठल मंदिर, शिव मंदिर या प्रमुख देवस्थानांना भेट देऊन आराधना केली जाते. पहाटेच्या वेळी अकरा गुरुवर्यांच्या हस्ते मंत्रोच्चारात देवीचा पंचामृताने अभिषेक महापूजा करण्यात आली. मध्यान्ह आरतीनंतर अकरा सुवासिनींना 'पातळ' वाटप करण्यात आले.

परंतू या आंबिल उत्सवात नांदेड शहरातील मंत्री या व्यापारी भक्ताने देवीला दान दिलेले सव्वा किलो वजनाचे पाच चांदीचे मुकुट गायब झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

सदरील ५ मुकुटे विश्वस्थांनीच घरी नेल्याचे बोलले जात आहे. आंबिल परंपरेत पोचम्मा देवीला कुलकर्णी विश्वस्तांकडून पंचमिष्ठान भोग नैवेद्य दाखविला जातो. यामध्ये पुरणपोळी, पायस, करंजी, अनारसी आणि तांबोळ नैवेद्य असतो.

पोचम्मा देवीच्या विकासासाठी तीर्थक्षेत्र 'क' दर्जातून पथदिव्यासाठी यावर्षी २७ लक्ष रुपयांचा निधी शासनाने दिला होता. यातून केवळ सात लक्ष रुपयांचे पथदिवे देवीच्या रस्त्यावर बसविले आहेत त्यामुळे यातील २० लक्ष रुपयांच्या निधिवरही डल्ला मारला आहे. स्थानिक प्रशासनाने २७ लक्ष रुपयांचे काम पूर्ण झाल्याचा शेरा दिला असल्याचे कळते. त्यामुळे देवीच्या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे उघड होऊ नये याची काळजी घेतली जात आहे.

**देवीच्या २० लक्ष विकास निधीवर डल्ला मारला कुणी ?**

देवीच्या आवारात पथदिवे बसवण्यासाठी आलेल्या २७ लक्ष निधीतून केवळ सात लक्ष रुपयांचे पथदिवे बसविल्याने २० लक्ष रुपयांवर नेमका कोणी डल्ला मारला ? याचा शोध जिल्हा प्रशासन घेणार का ? अशी प्रतिक्रिया भक्तगणांतून उमटत आहे.

## कळव्यात जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते शिवध्वजाचं अनावरण

### तब्बल ५२ फूट उंचीच्या लोहस्तंभावर फडकवला ध्वज





**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०७, कळवा (ठाणे)** : शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज नगर येथे भव्य शिवध्वज' डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते लोकार्पित करण्यात आला. शिवरायांच्या विचारांचा जागर व्हावा. या उद्देशाने हा ध्वज उभारण्यात आला आहे. दरम्यान, या प्रसंगी डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी आजचा शिवराज्याभिषेक दिन म्हणजे मराठी अस्मितेचा आणि महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाची ओळख करून देणारा आहे. कारण, आजच्याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराज यांनी कर्मकांड झुगारून रयतेचे राज्य स्थापन केले, असे प्रतिपादन केले.

कळवा पूर्व येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याचा तसेच विचारांचा जागर व्हावा. या उद्देशाने भव्य शिवध्वज उभारण्यात यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली होती. त्याच अनुषंगाने सुमारे ५२ फूट उंचीच्या लोहस्तंभावर २०÷३० फूट आकारमानाचा शिवध्वज फडकत ठेवण्याची संकल्पना डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी मांडली होती. शुक्रवारी शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून या शिवध्वजाचे अनावरण करण्यात आले. यावेळी डॉ.जितेंद्र आव्हाड म्हणाले की, आजच्याच दिवशी जगात सर्वात आधी रयतेचे राज्य स्थापन झाले. या देशात जुलमी राजवटीविरुद्ध प्रथमच बंड करून मराठी अस्मिता जगाला दाखवून देणारे एकमेव राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज ! राज्याभिषेकाला विरोध करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून आपला राज्याभिषेक करून छत्रपती शिवाजीमहाराज यांनी कर्मकांडाला दूर सारले होते. कर्मकांड नाकारून शिवरायांनी महाराष्ट्राचे पुरोगामित्व जगासमोर मांडले होते.

व्हिएतनाम सारख्या छोट्या देशाने अमेरिकेसारख्या बलाढ्य सत्तेला नमविले. या व्हिएतनामनेही आपल्या छत्रपती शिवाजीमहाराज यांचाच आदर्श समोर ठेवला होता अन् त्याची कबुली आजही ते देत आहेत. महाराजांनी स्थापन केलेल्या रयतेच्या राज्याला नख लावण्याचे काम खंडोजी खोपडे, कृष्णाजी भास्कर कुलकर्णी ने केले. मात्र, त्यांचा इतिहास लिहिला गेला नाही. इतिहास सुभेदार तानाजी मालुसरे, हंबीरराव मोहिते आणि जीवाजी महाले यांचा लिहिला गेला. आपण या शूरवीरांचे वारस आहोत. गद्दारांना या मातीत ठेचल्याशिवाय हा महाराष्ट्र कधी शांत बसलेला नाही. गद्दारी करणारे लोक विकासासाठी नाही स्वयंविकासासाठी गेले आहेत. त्यामुळे विकासाचा टेंभा कुणी मिरवू नका. इथे दिसणारा विकास १५ वर्षांच्या मेहनतीचा परिणाम आहे.इथे उभारलेला भगवा हा कोण्या पक्षाची नाही तर मराठी अस्मितेची, त्यागाची आणि शौर्याची निशाणी आहे, असेही डॉ.जितेंद्र आव्हाड म्हणाले. तत्पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या पुढाकारातून दुचाकीची शिव रॅली काढण्यात आली. कळवा नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या रॅलीला सुरूवात करण्यात आली. या रॅलीत शेकडो शिवप्रेमी कार्यकर्ते उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज , छत्रपती संभाजी महाराज यांच्या गौरवाच्या घोषणा देत ही रॅली कळवा नाका, कळवा परिसर अशी फिरून छत्रपती शिवाजी महाराज नगर येथे विसर्जित करण्यात आली.

या लोकार्पण सोहळ्यास अरविंद मोरे, नगरसेविका वर्षा मोरे, नगरसेवक राजेश खारकर, नताशा आव्हाड, अभिजित पवार, महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस, राजेश कदम, ठाणे जिल्हा प्रशासन सरचिटणीस राजेश साटम, व्यापारी सेल अध्यक्ष संजीव दत्ता, अंकुश मढवी, रचना वैद्य, समीर नेटके, विशांत गायकवाड, ज्ञानेश्वर राजपंखे, व्यापारी सेल अध्यक्ष संजीव दत्ता, शिवा ठाकूर, महेश भाग्यवंत, हिरामण गंगावासी, पद्माकर पाटील, शिवा यादव, दिगंबर गरुड, एकनाथ जाधव, जयेश पाटील, राहुल पाटील, इक्बाल शेख, फुलबानो पटेल, दिलीप उपाडे, विलास पाटील, विजय बागल विजय पवार, सुभाष यादव, रोहिदास पाटील, राजु शिंदे, मनिषा पाटील, साबिया खान आदी उपस्थित होते.

## टोईंग व्हॅन सुरू करण्याचे वाहतूक पोलीस उपायुक्तांना दिले निवेदन



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०७, ठाणे :** ठाणे वाहतूक पोलीस उपायुक्त अंतर्गत असलेले वाहतूक शाखेमध्ये गेल्या ६ महिन्यापासून वाहतूक टोइंग कागदोपत्री अपूर्तता त्यासाठी बंद करण्यात आली होती. पण सध्या ते पुन्हा सुरू होत असून पोलीस उपायुक्त वाहतूक विभागाचे पंकज शिरसाट यांना डोंबिवलीतील भाजपा, शिवसेना पदाधिकारी त्यासोबत समाजसेवक आणि माजी नगरसेवक व नगरसेविका यांनी त्यांची भेट घेतली. या भेटीमध्ये त्रस्त नागरिकांचे वाहतूक कोंडी सुटका करण्यासाठी चर्चा करून निवेदन देण्यात आली. पोलीस उपायुक्त वाहतूक विभागाचे पंकज शिरसाठ यांनी टोईंग व्हॅन वरील कर्मचारी यांनी कारवाई करताचे नियमावलीचे संपूर्ण माहिती त्यांनी दिली.

# पालकमंत्री गोरे यांच्याकडून भक्ती सागर, वाळवंट व पालखी तळांची पाहणी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** आषाढी यात्रेच्या अनुषंगाने यात्रा कालावधीत पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी तळांवर, भक्ती सागर (६५ एकर), चंद्रभागा वाळवंट येथे उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या सुविधांची पाहणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून करण्यात आली. यावेळी ६५ एकर (भक्ती सागर) येथे पाणी साठणार नाही याची दक्षता घेऊन मुरमीकरण व रोलिंग करावे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक ती तांत्रिक मदत संबंधित यंत्रणेला करावी. तसेच या ठिकाणी वारकरी भाविकांना कायमस्वरूपी सुविधा देण्याबाबत नियोजन करावे करावे. स्वच्छता गृहाची तातडीने दुरुस्ती करून स्वच्छता करावी. चंद्रभागा नदी पत्राच्या कडेला असणारी काटेरी झाडे झुडपे, मातीचे व दगडाचे ढिगारे तात्काळ काढून घ्यावेत. नदीपात्रातील पाणी स्वच्छतेसाठी नगरपरिषदेकडून बसविण्यात आलेल्या सेबर टेक्नॉलॉजी मशीनला तातडीने वीज वितरण कंपनीने विद्युत पुरवठा करण्याचे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले. तसेच पालकमंत्री श्री.गोरे यांनी वाखरी, बाजीराव विहीर, श्री संत सोपान काका, भंडीशेगाव, पिराची कुरोली, वेळापूर, माळशिरस, नातेपुते, धर्मपुरी येथील पालखी तळांची व रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची पाहणी केली.

यावेळी बाजीराव विहीर (वाखरी) येथे संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज पालखी सोहळ्याचे गोल रिंगण होते. हा रिंगण सोहळा पाहण्यासाठी वारकरी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने कोणतीही दुर्घटना घडू नये. यासाठी उड्डाणपुलाच्या शेजारी असणारे लोखंडी बॅरिकेटिंग रिंगण सोहळा कालावधीत काढून घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या. तसेच पालखीतळांवर पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधामध्ये पिण्याचे पाणी, शौचालय, स्नानगृह, महिला भाविकांची व्यवस्था आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था आदी बाबतची माहिति तसेच सर्वच पालखी तळांवर मुरमीकरण करावे अशा सूचना दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत आमदार सम ाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तमराव जानकर, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी



अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त तुषार ठोंबरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, प्रांताधिकारी सचिन इथापे, विजया पांगारकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, सुरेश शेजुळ मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मंदिर समितीची व्यवस्थापक मनोज श्रोत्री तसेच अन्य विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# ठाण्यातील तलावाच्या सुशोभिकरणाला स्थानिकांचाच विरोध...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०५, ठाणे :** घोडबंदर येथील हिरानंदानी इस्टेट येथील कावेसर तलावालगत ठाणे महापालिकेने घेतलेल्या सुशोभिकरणाच्या निर्णयाला त्या भागातील रहिवाशांचा आणि ठाण्यातील पर्यावरणप्रेमी नागरिकांचा विरोध आहे. पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर या सर्व नागरिकांनी कावेसर तलावाजवळ एकत्रित येत ठाणे महापालिकेने घेतलेल्या सुशोभिकरणाच्या निर्णया विरोधात निदर्शने केले.

कावेसर तलावाच्या आजूबाजूला नैसर्गिक संपत्ती आहे. या सुशोभिकरणाम ुळे ही नैसर्गिक संपत्ती नष्ट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आमचा ठाणे महापालिकेच्या या निर्णयाला कायम विरोध असेल, असा सुचक इशारा या नागरिकांनी यावेळी दिला.घोडबंदर येथील हिरानंदानी इस्टेट भागातील कावेसर तलावाच्या येथे सुशोभिकरण करण्याचा निर्णय ठाणे महापालिकेने घेतला. या कामाचे भूमिपूजन देखील पार पडले. परंतू, ठाणे महापालिकेने घेतलेल्या या सुशोभिकरणाच्या निर्णयाला येथील स्थानिक रहिवाशांचा तसेच ठाण्यातील पर्यावरणप्रेमींचा विरोध आहे.





त्यामुळे गेले अनेक दिवसांपासून कावेसर तलाव हा चर्चेचा विषय बनला आहे.

या भागातील रहिवाशांनी व्हॉट्सॲप तसेच इतर समाजमाध्यमांद्वारे तलाव वाचविण्याची मोहीम हाती घेतली आहे. यासंदर्भात, काही दिवसांपूर्वीच ऑनलाईन याचिका तयार करण्यात आली. यामध्ये चार हजारहून अधिक जणांनी स्वाक्षरी करून सुशोभिकरणास विरोध दर्शविला. तसेच जनजागृतीसाठी परिसरात फलक उभारण्यात आले आहेत.पर्यावरण दिनाचे औचित्य साधून या सर्व मंडळींनी एकत्रित येत कावेसर तलावाजवळ निदर्शने केली. यामध्ये तरुणांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. 'कावेसर तलाव वाचवा', 'निसर्गाचा आदर करा, कॉंक्रिटीकरण थांबवा' अशा विविध आशयाचे फलक हातात घेऊन या नागरिकांनी निदर्शने केली. या निदर्शना दरम्यान कोणताही अनूचित प्रकार घडू नये यासाठी स्थानिक पोलिस देखील याठिकाणी उपस्थित होते.

**दरम्यान कावेसर तलावाचे महत्त्व**

कावेसर तलाव हा सुमारे १५० वर्ष जुना आहे. या तलावाच्या भोवती जैवविविधता आहे. तसेच या तलावात दुर्मिळ मानले जाणारे पांढरे कमळ आढळून येते. त्यामुळे पर्यावरणप्रेमी तसेच हिरानंदानी भागातील नागरिक या ठिकाणी फेरफटका मारण्यासाठी नेहमी जातात. हिरानंदानी इस्टेट भागात बगीचे आहेत. परंतु नैसर्गिक तलाव येथील रहिवाशांसाठी आकर्षणाचा भाग ठरतो. त्यामुळे या तलावाच्याभोवती सुशोभिकरण झाले तर, येथील जैवविविधतेवर त्याचा परिणाम होण्याची भिती नागरिक व्यक्त करत आहेत.


ठाणे हे तळ्यांचे शहर म्हणून ओळखले जाते आणि आज त्याच शहरात तळ्याचा विनाश होत आहे. हे बघताना त्रास होतोय. त्यामुळे आमचा ठाणे महापालिकेच्या या निर्णयाला कायम विरोध राहणार आहे अशी स्थानिकांचे म्हणणे आहे.आम्हाला कोणतेही आंदोलन रस्त्यावरती येऊन करायचे नाहीये केवळ आमचे म्हणणे पटवून समाजात जागरूकता निर्माण करायची आहे .मुळात कावेसर तलाव ही जागा आधिपासून सुंदर आहे. त्याठिकाणी सुशोभिकरणाची गरज नाही. ठाणे महापालिकेला याठिकाणी काही करायचं असेलच तर, त्यांनी आवश्यक सुविधा येथे द्याव्या. जशा की, या तलावाच्या आजूबाजूला कचरा पेट्या ठेवाव्यात. कारण, याठिकाणी फिरायला येणाऱ्या नागरिकांना काही खाद्यपर्थांचा कचरा टाकण्यास पर्याय नाही. महापालिकेने जे सुशोभिकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या कामामुळे येथील जैवविविधतेला धोका निर्माण होण्याची अधिक शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने हा निर्णय त्वरित मागे घ्यावा अशी आमची मागणी आहे.

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालयास रु.३९.५० कोटी

## आधुनिक वैद्यकीय सुविधांचा नवा अध्याय : आमदार राणाजगजितसिंह पाटील

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०६, धाराशिव :** शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात अत्याधुनिक शस्त्रक्रियागार आणि आधुनिक वैद्यकीय सुविधांच्या अनुषंगाने अत्यावश्यक असलेल्या महत्वपूर्ण कामांना राज्य सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. आपल्या आयुर्वेद म हाविद्यालयास ३९.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या निधीपाठोपाठच आयुर्वे द महाविद्यालयातही आधुनिक वैद्यकीय सुविधांचा नवा अध्याय सुरू झाला असल्याची माहिती'मित्र'चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



माजी मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांच्या अथक प्रयत्नातून धाराशिव शहरात १९८६ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या शासकीय आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयाची भव्य इमारत उभारली आहे. आजघडीला तेथे एकूण १४ विविध विभाग कार्यरत असून ३१८ विद्यार्थी वैद्यकीय पदवीचे शिक्षण घेत आहेत. ६५ डॉक्टर याठिकाणी पदव्युत्तर शिक्षण घेत असून आयुर्वेदात १७ विद्यार्थी संशोधन करीत आहेत. १३२ खाटांची क्षमता असलेल्या शासकीय आयुर्वे द महाविद्यालय आणि रुग्णालयात प्रारंभी केवळ २५ एवढी प्रवेश क्षमता होती. आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून ही क्षमता आता ६० इतकी झाली आहे. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एन.एस. गंगासागरे यांनी रुग्णांना अधिक दिलासा मिळावा यासाठी सुसज्ज शस्त्रक्रियागार आणि विविध वैद्यकीय सुविधांच्या अनुषंगाने आपल्याकडे निधीची मागणी केली होती.

या सर्व बाबींचा रीतसर प्रस्ताव तयार करून राज्य सरकारकडे सादर करण्यात आला होता. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुशीफ यांच्या माध्यमातून तातडीने प्रस्तावास हिरवा कंदील मिळाला असून ३९.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आम दार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. शासकीय आयुर्वेद महाविद्यालयशी संलग्न असलेल्या आयुर्वेद रुग्णालयात आता जिल्हा आणि परिसरातील रुग्णासाठी लवकरच अत्याधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार आहेत. रुग्णसेवेच्या गुणवत्तेत आमूलाग्र बदल घडवण्यासाठी महत्वाच्या आधुनिक सुविधा कार्यान्वित करण्यासाठीच हा ३९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याठिकाणी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आपल्या महायुती सरकारच्या माध्यमातून १२ कोटी रुपयांची स्किल लॅब उभारली जात आहे. लवकरच ती कार्यान्वित होणार आहे.

आत्ता मंजूर करण्यात आलेल्या ३९.५० कोटी रुपयांच्या भरीव निधीतून सुसज्ज शस्त्रक्रिया कक्ष व उपकरणे (Modular OT) साकारण्यात येणार आहे. त्यामुळे अचूक, सुरक्षित आणि आधुनिक शस्त्रक्रिया करता येणारे अद्ययावत ऑपरेशन थिएटर शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर केंद्रीकृत निर्जंतुकीकरण विभागही (CSSD) उभारला जाणार आहे जेणेकरून सर्व वैद्यकीय उपकरणांचे शास्त्रोक्त पद्धतीने निर्जंतुकीकरण शक्य होणार आहे. वाढती रुग्णसंख्या ध्यानात घेऊन वैद्यकीय गॅस पुरवठा यंत्रणाही कार्यान्वित केली जाणार आहे. त्यामुळे शस्त्रक्रिया कक्ष, ICU, नवजात शिशूखउण, आपत्कालीन सेवा व पुनर्वसन विभागासाठी सतत वैद्यकीय गॅसची उपलब्धता राहणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

रुग्णांसाठी सशक्त वैद्यकीय पाऊलधाराशिव जिल्हा आणि परिसरातील नागरिकांसाठी ही केवळ वैद्यकीय सुविधा नाही, तर रुग्णांच्या आरोग्याच्या दृष्टीने एक सशक्त पाऊल आहे. त्यामुळे शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित, स्वच्छ व आधुनिक पद्धतीने करता येतील. रुग्णालयातील संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षणीयरीत्या कमी होईल, ICU व नवजात शिशूंसाठी अत्याधुनिक सुविधा, आपत्कालीन परिस्थितीत जलद आणि प्रभावी उपचार आणि उपचारांचा दर्जा उंचानार आहे. निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल जिल्ह्यातील जनतेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुशीफ यांचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी आभार मानले आहेत.

# थोडक्यात

## महावितरणचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०६, धाराशिव :** महावितरण कंपनीचा २० वा वर्धापन दिन धाराशिव शहरातील मंडळ कार्यालय परिसरात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त मंडळ कार्यालयाची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दिनांक ०६ जून २०२५ रोजी महावितरणच्या वर्धापन दिन स्वस्तिक मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. जवळपास एक हजार विद्युत अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कामगार व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रम ाच्या प्रारंभी कार्यकारी अभियंता (प्रशासन) निलांबरी कुलकर्णी, तुळजापूर विभागाचे कार्यकारी अभियंता नंदकुमार काळे, धाराशिव विभागाचे कार्यकारी अभियंता नरेंद्र रडे, व्यवस्थापक दिलीप पाटोळे आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून व वर्धापन दिनानिमित्त केक कापण्यात आला.

महावितरणच्या वर्धापन दिनानिमित्त १ ते ५ जून दरम्यान जिल्ह्यात सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहात योगदान देणार्या अधिकारी, कर्मचार्यांना बक्षीसे वितरण करण्यात आली. तसेच सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम ही घेण्यात आला. भोजन व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या शेवटी व्यवस्थापक दिलीप पाटोळे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी महावितरण कंपनीचे अधिकारी, अभियंता, कर्मचारी, कंत्राटी कामगारांनी परिश्रम घेतले.

## आपदा मित्र प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद; पहिल्याच दिवशी १५० उमेदवारांचा सहभाग



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०६, बीड :** दिनांक ०६ जून २०२५ रोजी पासून जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सुरु झालेल्या १२ दिवसीय आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रमास उमेदवारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून पहिल्याच दिवशी सुमारे १५० प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला आहे. विशेष म्हणजे, यामध्ये महिलांचाही लक्षणीय सहभाग दिसून येत असून आपत्ती व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रात महिला देखील सक्रियपणे पुढे येत आहेत, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे.हा प्रशिक्षण उपक्रम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण एस.डी.एम.ए यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला असून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व जिल्हा क्रिडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणात उमेदवारांना आपत्तीच्या वेळी तात्काळ मदत, बचाव कार्य, प्राथमिक उपचार, स्ट्रेचर वापर, दोरखंडाची मदत तसेच पूर, भूकंप, वीज पडणे यासारख्या नैसर्गिक आपत्तींम धून नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठीचे प्रशिक्षण दिले जात आहे. व्यावसायिक प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण दिले जात आहे.

महिला प्रशिक्षणार्थींनी यामध्ये विशेष आवडीने सहभाग घेतल्याने 'आपदा मित्र' ही मोहीम सर्वसमावेशक आणि समतोल दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसून आले आहे. महिलांचे सहभागाचे प्रमाण वाढल्याने आपत्ती काळात स्थानिक स्तरावर महिलांच्या माध्यमातूनही प्रभावी मदत मिळू शकणार आहे. प्रशिक्षणाच्या प्रारंभी प्रशिक्षकांनी प्रशिक्षणाच्या गरजेवर भर देत उपस्थितांमध्ये आपत्ती काळात स्वयंसेवेच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याचा संदेश दिला. हा उपक्रम पुढील १२ दिवस सुरू राहणार असून दररोज विविध प्रात्यक्षिके व सैद्धांतिक सत्राद्वारे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणानंतर पात्र उमेदवारांना आपत्ती व्यवस्थापन किट व प्रशस्तीपत्रक देण्यात येणार असून त्यांची नोंद 'आपदा मित्र' म्हणून जिल्हास्तरावर करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये बीड मधील नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी कॅंडेड, सामाजिक संस्था, आशा / अंगणवाडी सेविका, होमगार्ड, पोलिस, खाजगी सुरक्षा रक्षक, शासकीय/ निमशासकिय कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## नांदगाव येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.०६, नांदगाव (नाशिक) :** दिनांक ०६ जून २०२५ रोजी शहीद जाट भगतसिंह शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदगाव जि.नाशिक येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मंगल प्रभात लोढा, मंत्री कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनातून अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबतचे परिपत्रक सर्वच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना प्राप्त झाले होते. परिपत्रकातील पंचसूत्रांपैकी सामाजिक समरसता हा विषय आजच्या या दिवशी व्याख्यानासाठी निवडला होता. सर्व जाती धर्म, वर्ग आणि पंथ यांच्यात समता, बंधूता आणि सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करणे म्हणजे सामाजिक समरसता. यात भेदभाव न करता सर्वांना समान संधी देणे, एकमेकांचा सन्मान करणे आणि समाजात एकात्मता वाढवणे अपेक्षित आहे. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कौशल्य विकास रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा यांच्या व्हिडिओ संदेशाने करण्यात आली.

या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून नितेश शर्मा (शिवभक्त) तसेच कार्यक्रम ाचे अध्यक्ष स्थान प्रसिद्ध कवी व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे (बालभारती) चे सदस्य, डॉ.अ.फ.भालेराव यांनी भूषविले.